Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VII Issue – VI November - December 2018

# शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमानाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**प्रा. डॉ. वडमारे धनंजय सूर्यकांत**
**वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, जालना**

**प्रस्तावना :**

आजचे युग हे ज्ञान, विज्ञान आणि तंत्रविज्ञान या नावाने ओळखले जाते. आज ज्ञानाबरोबर वाढती लोकसंख्या यामुळे अनेक संस्थांनी जन्म घेतला आहे. त्यामध्ये आतंकवाद, जातीय दंगली, वांशिक भेदाभेद, धार्मिक हिंसाचार, अंधविश्वास, प्रांतियता, भाषावाद, युध्द, मारामारी, सामाजिक आणि राजकीय अस्थैर्य, चोरी, लुटमार, खून याचबरोबर वेगवेगळ्या क्षेत्रात असणारी जीवघेणी स्पर्धा तसेच भ्रष्टाचार सर्व स्तरावर होणारा सत्तेसाठी संघर्ष इ. कारणामुळे सामान्य जनजीवन अत्यंत अस्थिर आणि असुरक्षित बनले आहे. प्रत्येक व्यक्ती या असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर शांतीची अपेक्षा करत आहे.

या सर्वांचा परिणाम सर्वाधिक होत असेल तर तो म्हणजे आजचे शिक्षण घेणारे विद्यार्थी जे वय आणि अनुभव या दोन्ही स्तरावर लहान आहेत. त्यांना चांगले वाईट याची समज नाही. हे विद्यार्थी उद्याचे देशाचे भविष्य घडविणारे सुजान नागरीक आहेत. हेच जर अशा वातावरणात वाढले तर देशाची शांतता नष्ट होईल. यासाठी देशाच्या भविष्याबरोबर विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित राहण्यासाठी, सर्वत्र शांतता निर्माण होण्यासाठी शांतता शिक्षणाची आवश्यकता आहे. हे शिक्षणाच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकते कारण शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. तसेच सत्य, अहिंसा, मानवता, स्वदेश प्रेम, देशभक्ती इ. संस्कार शिक्षणामुळे होतात. अशा संस्कारक्षम वातावरणात वाढलेला विद्यार्थी एक कर्तव्यनिष्ठ, सुजान, सक्षम नागरिक होईल यासाठी आज शांतता शिक्षण देणे आवश्यक आहे.

आपल्याला शांतता सर्व स्तरावर प्रस्थापित करावयाची असेल तर मुलांना हे शिकवायला हवे की, आपले विचार, भावना, वस्तू या दुस-यासोबत कशा वाटता येतील या शिक्षण प्रक्रियेतून असे बालक, किशोर व युवक घडायला हवेत जे कोणत्याही प्रकारचे मतभेद हिंसा यानी रोखून धरतील व अशी परिस्थिती निर्माण होईल जी शांती स्थापनेसाठी सक्षम असेल.

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना शांतता शिक्षण देण्यासाठी जाणीव जागृती प्रतिमान वापरण्याचे ठरविले कारण याद्वारे विद्यार्थ्यांना देशातील अस्थिरतेची, अशांततेची जाणीव होईल आणि विद्यार्थी स्वतःला सावरतोल तसेच देशाचे भविष्य चांगले घडविण्याचा निश्चित प्रयत्न करतील. स्वतः जीवन जगत असताना शांतीच्या मार्गाचा अवलंब करीत एकमेकाविषयी आदरभाव बाळगतील या जाणीवेतूनच संशोधकाला सदर संशोधन करणे आवश्यक वाटले.

**समस्या विधान :**

माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमानाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VII Issue – VI November - December 2018

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमानाच्या सहाय्याने केलेल्या अध्यापणाची परिणामकारकता अभ्यासणे.
२) शांतता शिक्षणासाठी पारंपारिक पध्दतीने केलेल्या अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.
३) शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमान व पारंपारिक पध्दतीने केलेल्या अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाची गरज व महत्व :**

**संशोधनाची गरज :**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात ज्ञानाचे स्वरूप विस्तृत होत आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात झपाट्याने प्रगती होताना दिसते पण दुसरीकडसमाजामध्ये संहिष्णूता, भ्रष्टाचार, कट्टरता, संघर्ष, आतंकवाद इ. चे संकट आधुनिक समाजाला आव्हान आहे. अशा स्थितीत शांततेसाठी शिक्षणाची गरज अधिक जाणवत आहे. आज वैयक्तिक, स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक स्तरावरील वेगवेगळे प्रश्न हाताळण्यासाठी शारीरिक हिंसा किंवा युध्द याचाच विचार प्राधान्याने केला जातो. पण युध्दामुळे केवळ मनुष्यहानी होत आहे. त्यामुळे अशांतता वाढायला मदत होत आहे.

महात्मा गांधीजीनी म्हटले आहे की, आपल्याला विश्वशांती निर्माण करावयाची असेल तर विद्यार्थ्यापासून करायला हवी. वर्तमान काळातील शांततेचे महत्व लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने २००५ च्या अभ्यासक्रमाच्या रुपरेषेत शांततेला महत्व दिले आहे. यासाठी माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यामध्ये शांततेविषयी जाणीव जागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हाच देशाचा पर्यायाने समाजाचा, स्वतःचा विकास होण्यास मदत होईल. या करीता शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमानाचा वापर केला तर ते अधिक परिणामकारक होईल या जाणिवेतून सदर संशोधन करणे गरजेचे वाटले.

**संशोधनाचे महत्व :**

१) शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमानाचा वापर केला तर ते अधिक परिणामकारकर होईल.
२) विद्यार्थ्यामध्ये सदाचार, सद्भावना, सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होईल.
३) देशाच्या विकासामध्ये हे विद्यार्थी अहिंसेच्या मार्गाने हातभार लावण्यास मदत करतील.
४) विद्यार्थी जेव्हा नागरीक म्हणून जीवन जगत असताना अहिंसा, नैतिकता, सामंजस्य इ. मूल्यांचा स्वतःच्या कृतीमध्ये अवलंब करुन शांततच्यामार्गाने जीवन जगतील.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

**व्याप्ती :**

१) प्रस्तुत संशोधनामध्ये औरंगाबाद शहरातील माध्यमिक शाळांचा समावेश करण्यात आलेला आहे.
२) प्रस्तुत संशोधनामध्ये शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमान व पारंपारिक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VII Issue – VI November - December 2018

**मर्यादा :**

१) प्रस्तुत संशोधन औरंगाबाद शहरातील महानगरपालिका माध्यमिक विद्यालयातील, इंदिरा नगर औरंगाबादमधील इयत्ता ९ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यापुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे शांतता शिक्षणापुरते मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधन हे जाणीव जागृती प्रतिमान व पारंपारिक पध्दतीपुरते मर्यादित आहे.

**संशोधन परिकल्पना:**

शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमान व पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांच्या संपादन गुणातील मध्यमानात सार्थ फरक दिसून येतो.

**शुन्य परिकल्पना :**

शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमान व पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांच्या संपादन गुणातील मध्यमानात सार्थक फरक दिसून येत नाही.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनासाठी संभाव्य आधारीत सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला. महानगरपालिका माध्यमिक विद्यालयातील, इंदिरा नगर औरंगाबाद या शाळेतील इयत्ता ९ वीच्या वर्गातील ६० विद्यार्थ्यांची नमुना निवड करण्यात आली.

**संशोधन कार्य पध्दती :**

संशोधन पध्दती प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर करण्यात आला.

**संशोधन अभिकल्प :**

प्रस्तुत संशोधनासाठी समान गट अभिकल्पांचा उपयोग करण्यात आला.संशोधिकेने तयार केलेल्या संपादणूक चाचणीद्वारे दोन समान गट तयार करून नियंत्रित गटास पारंपारिक पध्दतीने व प्रायोगिक गटास जाणीव जागृती प्रतिमानाद्वारे अध्यापन केले. त्यानंतर दोन्ही गटास उत्तर चाचणी देऊन परिकल्पनांचा पडताळा घेण्यात आला.

**संख्याशास्त्रीय साधने :**

प्रस्तुत संशोधनासाठी मध्यमान, प्रमाण विचलन व धड़ परीक्षेचा उपयोग करण्यात आला. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्धनिर्वाचनपूर्वचाचणी व उत्तर चाचणीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे मध्यमान, प्रमाण विचलन घड परिक्षिका यांच्या साहाय्याने विश्लेषण करुन अर्थनिर्वाचन करण्यात आले. त्यानुसार परिकल्पनांचा पडताळा घेण्यात आला व निष्कर्ष काढण्यात आले.

प्रायोगिक गट आणि नियंत्रीत गटाच्या पूर्वचाचणी व उत्तरचाचणीमधील प्राप्तांकाच्या फरकाचे

मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी-परीक्षिका दर्शविणारे कोष्टक.

| गट | एकून संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी-परीक्षिका |
|---|---|---|---|---|
| प्रायोगिक गट | ३० | २६.२ | ४.२५ | ८.१६ |
| नियोजित गट | ३० | १४.२ | २.१५ | ४.१० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, प्राप्त हे ०.०५ सार्थकता स्तरापेक्षा अधिक आहे. त्यामुळे शुन्य परिकल्पनेचा त्याग केलाव संशोधन परिकल्पनेचा स्विकार करण्यात आला.

**निष्कर्ष :**

१) शांतता शिक्षणासाठी जाणीव जागृती प्रतिमान हे पारंपारिक पध्दतीपेक्षा अधिक परिणामकारक आहे.

२) विद्यार्थ्यांना कोणतीही समस्या निर्माण झाल्यास ती शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होईल.

३) विद्यार्थी अहिंसेचा मार्ग स्विकारतील.

४) भावी काळामध्ये सुजान नागरिक म्हणून जीवन जगत असताना विद्यार्थ्यांमध्ये सदाचार, सद्वृत्ती, सद्भावना, समायोजन या मुल्यांचा वापर दिसून येईल.

५) शांतता शिक्षणासाठी अशा प्रतिमानांचा वापर केल्यास विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग मिळतो.

**संदर्भ ग्रंथ :**

१) मुळे श. शि. उमाटे वि. तु. (१९९५), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, पुणे, महाराष्ट्र राज्य विद्यापीठ ग्रंथ प्रकाशन.

२) भिंताडे वि. रा. (१९८९), शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नूतन प्रकाशन.

३) ब्रुश जॉस, माश वील, मॉडेल्स ऑफ टिचिंग, नवी दिल्ली, प्रिंटाइस हॉल ऑफ इंडिया,

४) शिक्षण तरंग, (सप्टें., ऑक्टो. २०११), संपादक डॉ. किशोर चव्हाण.

५) शिक्षण तरंग (नोव्हें. २०११),संपादक डॉ. किशोर चव्हाण.